# संत चोखामेळा यांच्या अभंगातील भावसौंदर्य

प्रा. डॉ. गणेश लहाने
मराठी विभाग प्रमुख
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

## १) प्रस्तावना :-

महाराष्ट्रात तेराव्या शतकात वारकरी संप्रदायाचा उदय झाला. संप्रदायाची पायाभरणी करण्याचे महान कार्य संतश्रेष्ठ, योगियांची माऊली संत ज्ञानेश्वर महाराजांनी केले, तर संत नामदेव महाराजांनी महाराष्ट्रातील पंढरपूरपासून पंजाबपर्यंत पायी पदयात्रा करून वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार केला. संत ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या समकालीन महाराष्ट्रात अनेक जाती-धर्मातील संत मंडळीनी अभंगनिर्मिती केली. पंढरपूरचे विठ्ठलच आपला कर्ता-धर्ता आई-वडील आहेत असा भाव संतानी आपल्या अभंगवाणीतून व्यक्त केला आहे. यापैकीच एक महत्त्वाचे संत म्हणून संत चोखामेळा यांचा उल्लेख केला जातो.

संत चोखामेळा हे पहिले दलित कवी म्हणूनही ओळखले जातात. कारण दलित कवितेतील वेदना आणि विद्रोहाची जाणीव त्यांच्या कवितेतून / अभंगवाणीतून आलेली दिसून येते. संत चोखामेळा यांच्या कालखंडातील महाराष्ट्रातील सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी पाहता चार्तुवर्ण्य समाजव्यवस्था अस्तित्वात होती. संत चोखामेळा हे तर दलित जातीत जन्माला आलेले संत होते. मनात भक्ती असूनही प्रत्यक्ष विठ्ठलाचे दर्शन घेता येत नसल्याची खंत चोखामेळा यांनी आपल्या अभंगवाणीतून व्यक्त केली आहे. अशा या महान संताचा परिचय आणि त्याच्या अभंगवाणीतील भक्तीचा गोडवा खालीलप्रमाणे वर्णन करता येईल.

## २) संत चोखामेळा यांचा परिचय :-

संत चोखामेळा यांचा जन्म कधी झाला हे सांगता येत नाही कारण त्यांच्या जन्मासंबंधीची माहिती कोठेच उपलब्ध नाही. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांचे ते समकालीन होते एवढीच माहिती सांगता येते. संत चोखामेळा यांच्या जन्मासंबंधी निरनिराळ्या कथा सांगितल्या जातात. कांही अभ्यासकांच्या मते, "ते अयोनिज आहेत. कुणाला 'ते' परमेश्वरकृपेचे फळ आहे असे वाटते. पण त्यांच्या मातापित्यांची आणि जन्मतिथीची कांही निश्चित माहिती मिळत नाही हे मात्र खरे. असे असले तरी त्यांच्या निधनाची तिथी म्हणून वैशाख वद्य पंचमी शके १२६० असा पुरावा उपलब्ध आहे. म्हणजेच इ.स. १३३८ मध्ये चोखोबांचे देहावसान झाले."[१] अशी त्यांच्या जन्माविषयीची माहिती उपलब्ध आहे. त्यांचे जन्मगाव माहित नसले तरी ते मंगळवेढा येथे वास्तव्यास होते हे मात्र सत्य आहे. पंढरपूरला जाणा-या माणसांच्या सहवासामुळे ते विठ्ठल भक्तीकडे ओढले. संत चोखामेळा अनेक तीर्थक्षेत्रे फिरले पण इतरत्र मिळालेल्या हीन वागणुकीमुळे त्यांचे मन कोठेच रमले नाही. शेवटी पंढरपूर येथे आल्यास त्यांना विठ्ठल भक्तीची गोडी लागली हे सांगताना आपल्या अभंगात ते म्हणतात,

'पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी।
प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ।।"[२]

असा अनुभव त्यांनी आपल्या अभंगातून व्यक्त केला आहे.

## ३) दलित जातीत जन्मल्याची खंत :-

संत चोखामेळा यांना समाजात सतत मिळणा-या हीन वागणूकीमुळे त्यांना आपण अस्पृश्य जातीत जन्मल्याची खंत वाटत होती. मनात विठ्ठलभक्ती असूनसुद्धा प्रत्यक्ष जवळ जाऊन दर्शन घेण्याचे भाग्य लाभत नव्हते त्यामुळे ते वारंवार व्याकुळ होत. पण त्याचवेळी आपल्या हातून काहीतरी पूर्वजन्मात पाप घडले असल्यामुळे आपण महार जातीत जन्मालो हे सांगताना संत चोखामेळा म्हणतात,

"यातिहीन मी महार। पूर्वी निळाचा अवतार।
कृष्णनिंदा घडली होती। म्हणोनि महार जन्मप्राप्ती।।"[३]

या त्यांच्या शब्दातच त्यांच्या अंतरीची खंत व्यक्त होते.

**४) चोखामेळा यांच्या अभंगातील वेदना :-**

संत चोखामेळा यांच्या अभंगातून अनेक ठिकाणी वेदनेची भावना व्यक्त झाली आहे. संताचा सहवास आणि विठ्ठल दर्शनाची आस मनात असलेल्या चोखोबांना परमेश्वराचे दर्शन दुरुनच घ्यावे लागे, याचे दु:ख / वेदना त्यांच्या मनात होती. चोखोबांची भक्ती एवढी उज्ज्वल होती की, प्रत्यक्ष विठ्ठलानेच त्यांना दर्शन देऊन आपल्या गळ्यातील हार त्यांच्या गळ्यात घातला. पण बडव्यांना हे सहन झाले नाही चोखोबांना 'चोर' समजून त्यांनी बेदम मार दिला हे अभंगातून सांगताना संत चोखामेळा म्हणतात,

"धाव घाली विठू आता।
चालू नको मंद।।
मज मारती बडवे
कांहीतरी अपराध।।"[४]

माझी कांहीही चूक नसताना बडवे मला मारत आहेत ही मनातील वेदनेची जाणीव संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून व्यक्त केली आहे.

**५)चोखोबांचे संत आणि वारकरी यांच्यावरील प्रेम :-**

संत चोखामेळा यांना पंढरपूरबद्दल जेवढे प्रेम मनात वाटत होते तेवढेच प्रेम संत आणि वारकरी यांच्याबद्दलही वाटत होते. संत चोखामेळा यांच्या मते 'पंढरी' या नावाचा शब्द उच्चार करणा-या वारक-यांच्या घरी मोक्ष नांदत असतो. या सर्व संतांच्या सहवासामुळे, संगतीमुळे आपल्याला पांडूरंगाचे दर्शन घडते. जे वारकरी स्वतः नेमाने पंढरीची वारी करतात ते स्वतः भाग्यवान असतातच पण त्यांच्या सहवासात येणारेही भाग्यवान होतात म्हणून संत चोखामेळा आपल्या अभंगात म्हणतात,

"कोणी पंढरीसी जाती वारकरी
तयांचे पायांवरी भाळ माझे."[५]

पंढरपूरला जाणा-या संताच्या पायावर प्रेमाने चोखामेळा लोटांगण घालतात कारण त्या संतामध्ये पंढरपूरचा विठ्ठल चोखोबांना दिसतो.

संत चोखामेळा यांना संत नामदेवांबद्दल खुप आदर असल्याचे दिसून येते. संत नामदेवांविषयीचा आदर आणि भक्तिभाव व्यक्त करताना चोखोबा आनंदाने भारावून जात असत. कारण नामदेवांनीच त्यांना 'भक्तिभाव' दाखविला त्या आनंदाचे, प्रेमाचे स्वरूप वर्णन करणे अवघड होऊन जाते त्यावेळी कंठ दाटून आलेले चोखोबा म्हणतात,

"रुपदृष्टी धाय पाहाता न समाये
बोलतोंचि न ये काय करु।
चोखा म्हणे धन्य नामया तू गुरु
फेडिला आधारू जीवित्त्वाचा"[६]

संत नामदेवांनीच चोखामेळा याच्या मस्तकावर हात ठेवून गुरु उपदेश केला असे चोखोबा आपल्या अभंगातून वर्णन करतात.

संताचा आणि वारक-यांचा सहवास जन्मोजन्मी लाभावा असे चोखामेळा यांना वाटत असे. कारण संतांचा सहवास लाभला तर उपास - तापास आणि तीर्थयात्रा करण्याची आवश्यकता नाही. संताच्या भेटीचा दिवस हा 'सोन्याचा दिवस' असल्याचे चोखोबांना वाटते. संताचा सहवास आणि त्यांचे सामर्थ्य सांगताना चोखोबांना आपल्या 'हीन याती' ची जाणीव होत असते पण त्याचवेळी त्यांचे आत्मविकासी मन नकळत एक कल्पना फेकून जाते. त्यांच्या मनाला वाटते, चंदनाच्या सहवासामुळे बाभळी, टेकळी, टाकळी यासारखे वृक्षदेखील चंदनाप्रमाणेच होतात. अशा प्रकारे संत आणि वारकरी यांच्याविषयीचा मनातील आदरभाव संत चोखामेळा यांनी व्यक्त केला आहे.

**७) संत चोखामेळा यांच्या अभंगवाणीचे सौंदर्य :-**

संत चोखामेळा यांनी ज्या कालखंडात अभंग निर्मिती केली त्या सातशे - आठशे वर्षापूर्वी त्यांच्या समाजाला बहिष्कृत जीवन जगावे लागत होते. संत ज्ञानेश्वरांनी 'जातिवर्णातीत परमेश्वराची भक्ती करता येते' इतकेच सांगितले व करून दाखविले. पण 'भक्ती'च्या पलीकडे या जमातीला फारसा न्याय मिळाला नाही. केवळ भक्तिमार्गापुरतेच हे कार्य मर्यादित राहिले. समाजव्यवस्थेत त्यांना मानसिक कुचंबनाच सहन करावी लागत होती. त्यांच्या 'मनातील हे सामाजिक दुखणे'

त्यांच्या अभंगवाणीतून व्यक्त झाले आहे. विठ्ठलाचे दर्शन घेण्यास बडवे त्यांना मनाई करत असत हा भाव व्यक्त करताना चोखामेळा म्हणतात 'मज दूर दूर हो मनती, कैसी करू तुझी भक्ती' हा मनातील हुंदका त्यांनी आपल्या अभगातून व्यक्त केला आहे.

संत चोखामेळा यांच्या कविमनाचे रंग केवळ भक्तिभावनेचाच आविष्कार करणारे नाहीत तर त्यात जीवनाभिमुखतेचेही दर्शन घडते. हे त्यांचे मन संमिश्र भावनांना बोलके करणारे आहे. त्यांना विठ्ठलाचे दर्शन घेता आलेले नाही तरी त्यांच्या कविमनाने त्या रुपाला साकार करताना जे रंग उधळले आहेत त्यात भक्तीची उत्कटता आहे, विलक्षण सौंदर्य आहे. चोखोबांची कविता ही दोन अवस्थांमधली आहे. ती 'सामाजिक दुखणे' व्यक्त करताना जितकी परखड होते तितकीच पांडूरंगाच्या सहवासात कोमल झालेली दिसून येते.

**संत चोखामेळा यांच्या अभंगाचे विशेष :-**

१) संत चोखामेळा हे मराठीतील पहिले दलित कवी होते.

२) संत चोखामेळा यांच्या अभंगवाणीतून दलित जातीत जन्मल्याची खंत व्यक्त झाली आहे.

३) संत चोखामेळा यांच्या अभंगवाणीतून समाजाकडून सहन कराव्या व्यथा-वेदनांचे चित्रण आलेले आहे.

४) संत चोखामेळा यांच्या अभंगातून संत आणि वारकरी यांच्याबद्दल नितांत आदराची भावना व्यक्त झाली आहे.

५) संत चोखामेळा यांच्या अभगवाणीला प्रतिमांचा हव्यास नाही त्यामुळे ती सहज सोपी आहे.

६) संत चोखामेळा यांच्या अभंगातून 'सामाजिक दुखणे' परखडपणे व्यक्त झाले आहे.

७) संत चोखामेळा यांच्या अभंगातून कारुण्यभाव व्यक्त झालेला आहे.

८) संत चोखामेळा यांची अभंगवाणी रचना नसून घटना आहे.

९) संत चोखामेळा यांच्या अभंगातून भक्तिभावनेची उत्कटता, अंतरीच्या वेदना, वास्तव जीवनाचे दर्शन, आलेले आहे.

१०) संत चोखामेळा यांच्या अभंगवाणीतून सहजता व सोपेपणा आलेला आहे.

**संदर्भग्रंथ सूची :-**

१) डॉ. कानडे मु.श्री., प्रा. खार्डेकर भालचंद्र - 'संत चोखामेळा : अभंगवाणी (निवडक अभंग), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. जानेवारी १९८१, पृ.क्र. ०६

२) नसिराबादकर ल. रा. - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, सातवी आवृत्ती ऑक्टोबर २००९, पृ.क्र. ७७

३) तत्रैव, पृ.क्र. ०७

४) तत्रैव, पृ.क्र. १५

५) तत्रैव, पृ.क्र. २२

६) तत्रैव, पृ.क्र. २३